DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

नियमित फौजदारी केस क्र.८१/२०१८
निशाणी क्र.१६

## सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ याची जबानी

## (सदरची जबानी इन–कॅमेरा नोंदविण्यात आली.)

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | अक्षता शैलेश माने |
| वय | – | ३२ वर्षे, |
| व्यवसाय | – | पोलीस पाटील |
| मुळ राहणार | – | रा. आकले, पो. सवाद, ता. महाड, जि. रायगड. |

## सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रकाश जोशी यांच्याकडून

मी दिनांक २८/०४/२०१८ रोजी मी आकले या गावात होते. त्या दिवशी रमेश साळुंखे यांच्या मुलाचे लग्न दुपारी १२.३० वाजता होते. त्या लग्नात मी हजर होते. लग्न लागल्यानंतर जेवणाची पंगत सुरु होती. त्यावेळी जयेश पवार व अशोक साळुंखे यांच्यामध्ये वाद झाला. मी पोलीस पाटील असल्याने त्यांचा वाद सोडविण्यास गेले. त्यावेळी राजाराम दगडू माने हे तेथे आले व त्यांनी भांडण सोडविण्याचा बहाणा करुन माझ्या छातीला हात लावला. त्यावेळी पहिल्यांदा मला असे वाटले की, चुकुन हात लागला असेल, त्यामुळे मी बाजुला झाले. त्यानंतर पुन्हा भांडण सोडविण्याचा बहाणा करुन त्यांनी पुन्हा जाणीवपुर्वक माझ्या छातीला हात लावला, त्यामुळे माझ्या मनास लज्जा उत्पन्न झाली. त्यावेळी माझे हात खरकटे होते, मी त्यांना बाजुला केले. मी त्यानंतर घरी निघुन आले. राजाराम माने हे माझे चुलत सासरे आहेत. मी घाबरलेली असल्यामुळे सदर घटनेबद्दल कोणालाही सांगितले नाही.

०२) सायंकाळी माझे पती घरी आले, त्यांनी मला लग्न कसे झाले याबद्दल विचारले. मी त्यांना घटनेबद्दल सांगितले नाही. मी त्यानंतर महिनाभर डिप्रेशनमध्ये होते. माझी आई मला म्हणाली की, "तु शांत का

राहतेस". त्यावेळी मी आईला म्हणाले की, लग्नाच्या दिवशी माझ्यासोबत वर नमुद प्रकार झाला. त्यानंतर दिनांक १८/०५/२०१८ रोजी मी महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मी दिलेली तक्रार आता मला दाखविली. ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तक्रारीस **निशाणी क्र.१७** देण्यात येतो. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रथम खबरी अहवालास **निशाणी क्र.१८** देण्यात येतो.

०३) सदर घटनेबद्दल माझा न्यायाधीशांसमोर जबाब झाला होता. तो जबाब आता मला दाखविला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे जबाबास **निशाणी क्र.१९** देण्यात येतो. रमेश साळुंखे यांच्या मुलाच्या लग्नाची पत्रीका या कामी दाखल केलेली आहे. सदर पत्रीकेस **निशाणी क्र.२०** देण्यात येते. सदरचे लग्न हे बबन भानुदास कांबळे यांच्या जागेत होते. त्या जागेचा गट नंबर ६१अ/१ असा आहे. ज्यांनी मला त्रास दिला त्यांना पाहिल्यास मी ओळखेन. ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

## <u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. संजय भिसे यांचेकडून</u>

०४) सदर खटल्याच्या संपुर्ण पेपर्सच्या सही शिक्क्याच्या नकला मी दिनांक ०५/१२/२०१८ रोजी काढून घेतलेल्या आहेत. त्या नकला मी यापुर्वी वेळोवेळी वाचलेल्या आहेत व आज रोजी देखील साक्षीच्या येण्याअगोदर वाचलेल्या आहेत. मी दोन प्रकारे सहया करते. मी या खटल्याच्या नकला बाकीच्या साक्षीदारांना देखील वाचावयास दिलेल्या आहेत.

०५) माझ्या फिर्याद (निशाणी क्र.१७) वर दिनांक १८/०५/२०१८ ही तारीख नसुन ३१/०५/२०१८ ही तारीख आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दिनांक १८/०५/२०१८ रोजी पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली आहे. ती तक्रार मला दाखविण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/०५/२०१८ रोजीच्या तक्रारीत मी आरोपीस धक्काबुक्की केली असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर पाऊण तासांनी जेवणावळ सुरु झाली.

०६) अशोक साळुंखे हे नवऱ्यामुलाच्या मावशीचे पती होते. अशोक साळुंखे हे दापोली येथे राहतात व बुरुड समाजाचे जिल्हा अध्यक्ष आहेत. लग्नाच्या वेळी ५०० पेक्षा जास्त लोक हजर होते. जेवणाच्या वेळी देखील ५०० पेक्षा जास्त लोक हजर होते. सर्व लोक जेवुन गेले होते. अशोक साळुंखे व जयेश पवार यांच्यातील वाद मिटविण्याकरिता आरोपीने पुढाकार घेतला होता. सदर लग्नास माझी मुलगी भार्गवी व सृष्टी या हजर होत्या. माझे माहेरचे गाव देखील आकले हेच आहे. सदर लग्नाला माझे आई–वडील व भाऊ बहीण असे हजर होते. (साक्षीदार स्वतःहुन सांगते की, आई–वडील लग्न लावुन गेले).

०७) माझ्या सरतपासामध्ये सांगितलेली घटना ज्या ठिकाणी झाली त्या ठिकाणी ५०० लोक हजर होते. तथाकथित घटना झाल्यानंतर मी लगेच त्याबद्दल माझे पती, आई–वडील, भाऊ बहीण, सासु–सासरे, जवळचे नातेवाईक यांना कोणालाच सांगितली नाही. मी फिर्याद दाखल करण्यास गेले त्यावेळी माझा नवरा सोबत नव्हता. सदर लग्नास सागर तुकाराम माने या नावाची व्यक्ती हजर होती. सागर माने हा संपुर्ण लग्न व जेवणावळ संपेपर्यंत त्या ठिकाणी हजर होता. सदर खटल्यामध्ये ज्यांच्या

घरात लग्न होते त्या घरातील लोक व नवरा मुलगा, सागर माने हे साक्षीदार नाहीत. सदरचे लग्न व जेवणावळ पुर्ण संपेपर्यंत नवऱ्यामुलाची आई रेश्मा रमेश साळुंखे, नवऱ्यामुलाची मावशी अनुजा अशोक साळुंखे या देखील हजर होत्या. लग्नाच्या मंडपाच्या पुर्वेला नवऱ्यामुलाचे घर लागुनच आहे. रेश्मा साळुंखे व अनुजा साळुंखे या देखील सदर खटल्यामध्ये साक्षीदार नाहीत.

०८) नवऱ्यामुलाचे नातेवाईक व आई–वडील यांच्याशी माझे वाकडे नाही. सागर तुकाराम माने, रेश्मा रमेश साळुंखे व अनुजा अशोक साळुंखे यांच्याशी देखील माझा भांडणतंटा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस घटनेच्या दिवशी छातीवर धक्काबुक्की केली होती व त्यांना शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्याविरुध्द दिनांक ०२/०५/२०१८ रोजी पोलीस अधिक्षक, रायगड यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने माझ्या व साक्षीदारांच्या एम.आय.डी.सी. पोलीसांकडे जाबजबान्या झाल्या होत्या. त्यामध्ये सागर तुकाराम माने, रेश्मा रमेश साळुंखे व अनुजा अशोक साळुंखे या तिघांच्या देखील जाबजबान्या झाल्या होत्या. त्या जबान्यांमध्ये त्यांनी आरोपीने घटनेच्या दिवशी माझ्या छातीला हात लावला नाही असे सांगितले होते.

०९) आरोपीने माझ्याविरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन पोलीसांनी माझ्याविरुध्द तहसिलदार कार्यालय, महाड यांच्या कोर्टात चॅप्टर केस क्र.५२/२०१८ ही पाठविली होती. श्री. प्रदिप कुडळ हे त्यावेळी तहसिलदार होते. त्या खटल्यामध्ये माझा वैयक्तिक जातमुचलका कलम १०६ अन्वये शांतता राखण्यासाठी घेण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खटल्यामध्ये मी अंतरिम आदेशाद्वारे १ वर्षांकरिता चांगली

वर्तणुक ठेवेन व सार्वजनिक शांतता व प्रशासकीय शांतता राखण्याकरिता १ वर्षांकरिता अंतिम बंधपत्र लिहुन दिले आहे.

१०) हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यांनी प्रांताधिकारी, महाड यांच्याकडे त्यांना झालेलया धक्काबुक्कीबद्दल तक्रार अर्ज दिला होता. दिनांक १८/०५/२०१८ रोजी प्रांताधिकारी यांनी तहसिलदार, महाड यांना सदर बाबत चौकशी करुन आदेश करण्याबाबतचा आदेश केला होता. त्या कामी माझी चौकशी झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर रचना करुन मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी या कामी मला अनुरुप असलेले साक्षीदार पोलीसांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामध्ये नमुद केलेली कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, या खटल्यामधील साक्षीदार व त्यांची टिपणे खोटी आहेत.

११) दिनांक २८/०६/२०१९ रोजी मी आरोपीच्या दारासमोरील त्यांच्या मालकीचे फळ येणाऱ्या नारळाचे झाडाबद्दल तक्रार तंटामुक्ती अध्यक्षांकडे केली होती. तंटामुक्तीच्या निर्णयाप्रमाणे आरोपीने त्यांचे झाड तोडले. आरोपी हे पोलीस खात्यातुन ए.एस.आय. म्हणुन सेवानिवृत्त झालेले आहेत.

१२) आम्ही बुरुड समाजाचे आहोत. घटनेच्या पुर्वी बुरुड समाज व मराठा समाज यांच्यामध्ये होळीच्या वर्गणीवरुन वाद झाला होता हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या पुर्वी होळीच्या वेळी बुरुड समाजाकडून वर्गणी घेत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी मराठा समाजातील लोकांविरुध्द ॲट्रॉसिटीची तक्रार दाखल करण्यासाठी पुढाकार घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपीने मला संमती दिली नव्हती. माझे शिक्षण १२ वी कॉमर्स झाले आहे. मी पोलीस पाटील

असल्यामुळे कामानिमित्त माझे पोलीस स्टेशनला, प्रांत ऑफीसला व तहसिल ऑफीसला जाणे येणे असते. एखादा गुन्हा झाला त्याबद्दल तक्रार देणे त्याबद्दल आम्हाला शिकविले जाते व प्रशिक्षण देखील दिले जाते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद (निशाणी क्र.१७), छापील प्रथम खबरी अहवाल (निशाणी क्र.१८) व फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ (निशाणी क्र.१९) मधील सर्व मजकुर खोटा आहे. तथाकथित घटनेपुर्वी मी आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दिनांक ०२/०५/२०१८ रोजी पोलीस अधिक्षक, रायगड यांच्याकडे व प्रांताधिकारी यांच्याकडे तक्रार दिली व त्यावरुन माझी चौकशी झाली म्हणुन मी खोटी फिर्याद आरोपीविरुध्द दिली. या खटल्याकामी मला अनेक वेळा साक्षी समन्स निघालेले आहे. मी या पुर्वी अनेक वेळा अर्ज देऊन तारीख वाढवुन घेतली आहे.

१३) हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक २८/०४/२०१८ रोजी मी आकले या गावात होते, त्या दिवशी रमेश साळुंखे यांच्या मुलाचे लग्न दुपारी १२.३० वाजता होते, त्या लग्नात मी हजर होते, हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, लग्न लागल्यानंतर जेवणाची पंगत सुरु होती, त्यावेळी जयेश पवार व अशोक साळुंखे यांच्यामध्ये वाद झाला, मी पोलीस पाटील असल्याने त्यांचा वाद सोडविण्यास गेले हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी राजाराम दगडू माने हे तेथे आले व त्यांनी भांडण सोडविण्याचा बहाणा करुन माझ्या छातीला हात लावला हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पहिल्यांदा मला असे वाटले की, चुकुन हात लागला असेल, त्यामुळे मी बाजुला झाले, त्यानंतर पुन्हा भांडण सोडविण्याचा बहाणा करुन त्यांनी पुन्हा जाणीवपुर्वक माझ्या छातीला हात लावला, त्यामुळे माझ्या मनास लज्जा उत्पन्न झाली हे मी खोटे सांगते. हे

म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे हात खरकटे होते, मी त्यांना बाजुला केले, मी त्यानंतर घरी निघुन आले, राजाराम माने हे माझे चुलत सासरे आहेत, मी घाबरलेली असल्यामुळे सदर घटनेबद्दल कोणालाही सांगितले नाही हे मी खोटे सांगते.

१४) हे म्हणणे खरे नाही की, सायंकाळी माझे पती घरी आले, त्यांनी मला लग्न कसे झाले याबद्दल विचारले, मी त्यांना घटनेबद्दल सांगितले नाही, मी त्यानंतर महिनाभर डिप्रेशनमध्ये होते हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई मला म्हणाली की, "तु शांत का राहतेस", त्यावेळी मी आईला म्हणाले की, लग्नाच्या दिवशी माझ्यासोबत वर नमुद प्रकार झाला, हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर दिनांक १८/०५/२०१८ रोजी मी महाड एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात तक्रार दिली, मी दिलेली तक्रार आता मला दाखविली, ती तीच असुन त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविला, तो तोच असुन त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे हे मी खोटे सांगते.

१५) हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेबद्दल माझा न्यायाधीशांसमोर जबाब झाला होता, तो जबाब आता मला दाखविला, तो तोच असुन त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, रमेश साळुंखे यांच्या मुलाच्या लग्नाची पत्रीका या कामी दाखल केलेली आहे, सदरचे लग्न हे बबन भानुदास कांबळे यांच्या जागेत होते, त्या जागेचा गट नंबर ६१अ/१ असा आहे, हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, ज्यांनी मला त्रास दिला त्यांना

पाहिल्यास मी ओळखेन, ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत हे मी खोटे सांगते.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

SHAIKH BABASO S PATIL Digitally signed by SHAIKH BABASO S PATIL Date: 2023.04.05 10:54:28 +0530

महाड (**एस. एस. पाटील**)
दिनांक ०४/०४/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड